UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • डिसेंबर २०२२ • पुरवणी विशेषांक १३

## आज़ादी का अमृत महोत्सव

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

५८. लोकहितवादींचे राष्ट्रवादविषयक विचार

- डॉ. अंबादास ओंकार बाकरे ---------- २७१

५९. भारतातील बालकामगारांच्या समस्या व उपाय योजना

- प्रो. डॉ. आर. जी. रसाळ, प्रा. शैलेश संजय नळे ---------- २७८

६०. 'बारोमास' शेतकऱ्यांच्या जीवनाचे कटुसत्य मांडणारी कादंबरी

- डॉ. छोटू डी. पुरी ---------- २८०

६१. राजकीय पत्रकारिते समोरील आव्हाने: दृष्टिक्षेप

– प्रा. लक्ष्मण मारोती घोटेकर ---------- २८४

६२. भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज

– लेफ्ट. डॉ.पावडे खोब्राजी वामनराव ---------- २८९

६३. भारतातील स्त्रीवादी चळवळीची वर्तमान परिस्थिती

– प्रा.डॉ.मंगला कडवे ---------- २९२

६४. साहित्यातून दिसणारे कृषिजीवन (शिवराम कारंत यांच्या 'अशी धरतीची माया' या कादंबरीच्या अनुषंगाने)

– प्रा. डॉ. शर्मिला घाटगे ---------- २९५

६५. कान्होजी आंग्रे व सिद्दीच्या इ.स. १७१५ च्या तहात बाळाजी विश्वनाथाची भूमिका

– प्रा. डॉ. सुरेश. स. माळशिखरे, श्री. विजय सुखदेवराव निमजे ---------- २९८

६६. भंडारा जिल्हयातील कोसा उदयोगधंदयातील शेतकरी वर्गाच्या उभारणी व विकासात शासकीय योजनांची भुमिका

– डॉ.गोकुला भालेराव, डॉ.माधुरी खोब्रागडे ---------- ३००

६७. मानवी हस्तक्षेपामुळे नैसर्गिक संसाधनांचा होणारा ऱ्हास (जमीन, हवा व पाणी)

– डॉ. भारती प्रमोद गायकवाड ---------- ३०८

६८. भारतीय समाजसुधारक म. जोतीराव फुले

– प्रा.डॉ. कांबळे शिवाजी ईरबा ---------- ३११

६९. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील हेरवाडच्या स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान : स्थानिक इतिहासाच्या परिप्रेक्ष्यातून केलेला एक चिकित्सक अभ्यास.

– डॉ. दिपक वामनराव सुर्यवंशी ---------- ३१४

७०. भारतातील उच्च शिक्षणामधील आधुनिक विचार प्रवाह, आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना

– डॉ. आनंद ज्ञानेश्वर शिंदे ---------- ३१७

७१. स्थलांतर – हालचाल आणि घुसळता भारत – नवीन पुरावा

– डॉ. हरी साधू वाघमारे ---------- ३२०

ISSN No. 2394-5990

# साहित्यातून दिसणारे कृषिजीवन
## (शिवराम कारंत यांच्या 'अशी धरतीची माया' या कादंबरीच्या अनुषंगाने)

**प्रा. डॉ. शर्मिला घाटगे**
कला आणि वाणिज्य महाविद्यालय, गडहिंग्लज
ई मेल - sharmilagmore@gmail.com

**गोषवारा :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. या देशात जास्तीत जास्त मानव खेड्यात राहत असल्यामुळे शेती व निसर्ग यांचा जवळचा संबंध आढळून येतो. निसर्ग हा ग्रामीण जीवनातील अपरिहार्य घटक असल्याने त्याला सोडून ग्रामीण जीवनाचा विचार करता येत नाही. ग्रामीण समाजात विशिष्ट परंपरागत असे अनेक उद्योग असतात. बारा बलुतेदार हे महत्त्वाचे असून ग्रामीण संस्कृती या परंपरागत चाकोरीबद्ध जीवनशैलीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. अशी ही कृषी संस्कृती या खेड्यातल्या जीवन पद्धतीचा पाया असते.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक अभ्यासपद्धती, विश्लेषणात्मक अभ्यासपद्धती आणि समाजशास्त्रीय अभ्यासपद्धती यांचा वापर केला आहे.

**उद्दिष्टे :**

१. कृषीविषयक कादंबरीतील ग्रामीण जीवनाचा वेध घेणे.
२. कृषीविषयक कादंबरीतील शेतकऱ्यांचे कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक स्वास्थ्य स्पष्ट करणे.
३. कृषीविषयक कादंबरीतील शेती संबंधांच्या विविध समस्या आणि शेतकरी जीवनावर त्याचा झालेला परिणाम तपासणे.
४. कृषीविषयक कादंबरीतील कृषी जाणिवांचा शोध घेणे.

**प्रस्तावना :**

भारताची सुमारे ७० टक्के लोकसंख्या आजही खेड्यात राहते. खेड्यात लोक शेती, पशुपालन आणि शेतीपूरक अनेक उद्योग व्यवसाय करतात. त्यामुळेच भारतीय खेड्यांमधील गावगाड्याचा आधारभूत घटक म्हणजे शेतकरी. अठरापगड जातींचा बहुजन समाज हा हजारो वर्षापासून गुण्यागोविंदाने खेड्यात राहिला. पण पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडल्याने ग्रामीण स्तरावरील सांस्कृतिक जीवन ढवळले गेले. यामध्ये सर्वसामान्यांची घुसमट होऊ लागली. शेतकऱ्यांचे प्रश्न निर्माण झाले. खेडे कितीही सुधारली तरी कृषिकेंद्रितता हा खेड्यांचा आत्मा आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते, मग्रामीण जीवनातून फुलणारे, त्या वास्तवातून साकार होणारे साहित्य ग्रामीण असते. ग्रामीण भागात सर्वदूर पसरलेल्या समाजाची स्वतंत्र ग्रामसंस्कृती असते. ते शहरापेक्षा भिन्न असते. त्यामुळे त्याच्या मानवी स्वभावातही बदल दिसून येतो. तेथे कृषी संस्कृती ग्रामीण वास्तवतेचा पाया असते.[१]

अनुवाद साहित्यामध्ये आशय एकच असणं महत्त्वाचं असतं. फक्त भाषा वेगळी असते. महाराष्ट्र आणि कर्नाटक या प्रदेशातील संस्कृती थोड्याफार प्रमाणात सारखीच आढळते. साहित्यामध्ये कन्नड साहित्य विपुल प्रमाणात अनुवादित झालेले आहे. त्यापैकीच शिवराम कारंत हे कन्नड साहित्यातील एक महत्त्वाचे साहित्यिक असून त्यांच्या मराठी साहित्यामध्ये एकूण आठ कादंबऱ्यांचा अनुवाद झालेला आहे. त्यापैकी 'अशी धरतीची माया' या कादंबरीच्या अनुषंगाने दिसून येणारी कृषी जाणिवा याचा शोध या निबंधातून घेतला जाणार आहे.

**कृषीजाणिवा :**

शिवराम कारंत यांच्या जन्मस्थान व कर्मभूमी असलेल्या कर्नाटकामधील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील परिसर, जीवनानुभव व हे समजावून घेण्याची उत्कंठा याचा प्रत्यय येतो. त्यांच्या कादंबऱ्यांमधून सामाजिक, धार्मिक, राजकीय संस्कृती, ग्रामीण जीवन पद्धती, शहरी आकर्षण आणि बदलत्या जीवनशैलीमुळे ग्रामीण संस्कृतीचे होणारे विविध ज्ञान, अंधश्रद्धा, कौटुंबिक प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न अशा विविध अंगांनी जीवनचित्रण कादंबरीमधून प्रकट झाले आहे. विशेष करून 'अशी धरतीची माया' आणि 'डोंगराएवढा' या कादंबऱ्यांमध्ये प्रामुख्याने ग्रामीण जीवन आढळते. पारंपरिक जीवन जगणारे खेड्यातील लोक आणि त्यांची होत गेलेली बिकट अवस्था त्यांच्या कादंबऱ्यांमधून प्रामुख्याने चित्रित झालेली दिसते. एखादा भूप्रदेश, त्याच्या आजूबाजूचा परिसर, तेथील माणसे, निसर्ग, माणसांची दैनंदिन जीवनाची जगण्याची पद्धत, संस्कृती यांचे सूक्ष्म निरीक्षण त्यांनी

आपल्या कादंबऱ्यांमध्ये केले आहे. 'अशी धरतीची माया' कादंबरीमध्ये शूद्र, सावकार, ब्राह्मण यांची कौटुंबिक चित्रणे आलेली आहेत. कुटुंबातील हेवेदावे, द्वेष, तिरस्कार याचे चित्र आले आहे. या कादंबरीमधील तीन पिढीतील कौटुंबिक ग्रामीण जीवन प्रसंगानुरूप, निसर्गानुसार कशा पद्धतीने बदलत जाते, याचे वास्तव चित्रण कादंबरीमध्ये आलेले आहे. माणसांना मुक्या प्राण्यांविषयी प्रेम, जिव्हाळा, शेतीविषयी विशेष आकर्षण, मातीविषयी ओढ त्यांच्या कुटुंबांना वरून दिसते. या कादंबरीमध्ये राम एताळ यांच्या कुटुंबांच्या तीन पिढ्यांचे चित्रण आलेले आहे. पार्वतीला प्राण्यांविषयी आस्था आहे. तिच्या वागण्यावरून लक्षात येते, ती प्राण्यांबरोबर माणसासारखे वावरत असते. शेवटच्या घटका मोजत होती, त्यावेळचा प्रसंग पाहता येईल. त्यावेळी पार्वतीचे डोळे डबडबले होते. या दोन्ही गाईच्या अंगावरून हात फिरवून तिनं त्याचं सांत्वन केलं. आत चला, तुम्हाला पेज आणून वाढते. पार्वती गाईना म्हणाली आणि आतून पेज आणायच्या ऐवजी आपणासाठी केलेला भात आणून तिने त्याच्या पुढे ओतला. पण ती गुरं ही तसलीच. तो भात एकदा हुंगून पाहिला, त्याला तोंड काही लावलं नाही.[२] यावरून शेतकऱ्यांचे प्राण्याशी असलेले घनिष्ट संबंध दिसून येतात.

ग्रामीण भागात प्राणी आणि माणूस यांचे अतूट नाते संबंध दिसून येते. कृषी क्षेत्रात प्राणी हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. तेथील व्यक्तींचे जीवन पूर्णत शेतीवर अवलंबून आहे. त्यांच्या घरी गुरे, वासरे, गाई, बैल, म्हशी इत्यादी जनावरे आहेत. माणसासारखी माया, आपुलकी, जिव्हाळा प्राण्यांच्या बाबतीत देखील असल्याचे दिसून येते. कृषिकेंद्रित जीवन हे आजही निसर्गावर अवलंबून असलेले दिसते. पाऊस पडला तर हिरवीगार शेती फुलत जाते, पाऊस नाही पडला किंवा पूर आला तर पिके कोमेजून जातात किंवा हिरवीगार शेतीची नासाडी होते. निसर्ग तारक आहेत, तसाच तो संहारकही आहे. ऋतुमानानुसार होणाऱ्या निसर्गातील बदल शेतकऱ्यांच्या कृषी जीवनावर परिणाम होताना दिसतो. शेतकऱ्यांच्या शेतात ऊस, तांदूळ, सुपारी इत्यादी विविध पिके असतात. मात्र अवेळी पडणाऱ्या पावसात त्यांची धांदल उडायची. त्यावेळी सरस्वती म्हणायची, गाव म्हणजे मसणवटी झालेत. या पावसाळ्यात कुळवाने भाताची पेरणी करावी लागेल, असे दिसते. बियाणंसाठी थोडं भान ठेवलं असतं तर बरं झालं असतं.[३] कृषिकेंद्रित समाजरचनेच्या विविध घटकांनी मिळून ग्रामीण जीवन प्रत्ययाला येते. ग्राम देवता, यात्रा, उत्सव, मंदिर सहल व पूजास्थाने यामधील ग्रामीण भाषांची जडणघडण होत असते. काशीयात्रेला कोणी निघाले की वाजवा बाजा, वाजंत्री घेऊन गावकऱ्यांनी जाणारा निरोप द्यावा. जीवनात अशा विविध कृषिप्रधान घटकांच्या अनुषंगाने ग्रामीण जीवन अशी धरतीची माया या कादंबरीत येताना दिसते.

समुद्र किनाऱ्यावर निसर्गसौंदर्य, डोंगरांनी वेढलेला परिसर, गरिबीशी सदैव झुंज देणाऱ्या तिथल्या लोकांचे जीवन चित्रीत झाले आहे. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. निसर्गावर अवलंबून राहणारी शेती असल्यामुळे तेथील लोकांची आर्थिक परिस्थिती बर्यापैकी दिसून येते. शेतीमध्ये कधीकधी मालाला योग्य भाव मिळत नाही, म्हणून खरेदी करण्यासाठी कर्ज काढावे लागते. पावसाळा खूप त्यामुळे लोकांची शेती वाहून जाते. लोकांना जमीन जास्त नाही. शूद्रांना तर जमिनीवर कर्ज काढावे लागते. पण ते कर्ज भागवता येत नाही. म्हणून जमीन गहाण ठेवावी लागते. लग्न करण्यासाठी त्यांच्याजवळ पैसा नाही. त्यामुळे सुद्धा लोकांना कर्ज काढावे लागतात. अशा प्रकारे ग्रामीण भागातील लोकांना आपल्या जीवनामध्ये आर्थिक संघर्ष करावा लागतो, याचे चित्रण या कादंबरीमध्ये आलेले आहे.

ग्रामीण भागात प्राणी आणि माणूस यांचे अतूट नाते संबंध दिसून येतात. कृषिक्षेत्रात प्राणी हा महत्त्वाचा घटक असून तेथील व्यक्तीचे जीवन पूर्णत शेतीवर अवलंबून असते. शेतात मेहनत करायला सुरप्याचे बैल आहेत. त्यांच्या घरी गुरे, वासरे, गाई, बैल, म्हशी इत्यादी जनावरे आहेत. माणसाइतकीच माया, आपुलकी, जिव्हाळा प्राण्यांच्यामध्ये देखील असल्याचे दिसून येते. प्रा. उमाकांत कीर म्हणतात, पार्वतीच्या गोठ्यातल्या गाईला सारखे गोऱ्हे होतात. कालवड होतच नाही. ब्राह्मण घरात वळू काय कामाचा. म्हणून ती तरुणी विकण्यात येतात. असाच एक गोऱ्हा विकला जातो. तेव्हा त्याला गोंजारून निरोप देताना पार्वती म्हणते, जाऊन ये हं! मुलाला द्यावा तसाच निरोप ती मुक्या प्राण्याला देते. पुढे तिच्या गोठ्यातील एक गाय केंपी मरते. तेव्हाचे ही पार्वतीचे दुःख फक्त शेतकरीच समजू शकेल.[४]

प्राण्यांबद्दल माणसांना वाटणारे प्रेम यामधून व्यक्त होते. आधुनिकतेमुळे सामाजिक जीवनात स्थित्यंतर घडू लागली की, त्याचा परिणाम ग्रामीण जीवनावर साहजिकच होत असतो. शहरी आकर्षणामुळे माणसे शहरांकडे धावू लागतात. तेथील संस्कृतीचा त्यांच्यावर परिणाम होत असतो. आणि त्यामधून व्यसनी, उधळेपणा असणारी तरुण पिढी निर्माण होते. आणि त्यातूनच त्यांचे वैयक्तिक जीवन उद्ध्वस्त होते. पण काही वेळेला संस्कारातून घडून शहरात गेलेली पिढी शिक्षण, नोकरीच्या संदर्भात वैफल्य येऊनसुद्धा संकटांना सामोरे जाताना दिसते व वैयक्तिक जीवन उद्ध्वस्त न होऊ देता परत आपल्या मातीकडे येऊन कष्ट करताना दिसते. कादंबरीमध्ये तीन पिढ्यातील वेगळ्या

ISSN No. 2394-5990

टप्प्यावरचे ग्रामीण जीवन चित्रित झाले आहे. वेगवेगळ्या जाती, व्यक्तींमधील परस्परसंबंधांचे चित्रण आले आहे. तसेच पारंपरिक रुढींचे, सणावारांचे, अंधश्रद्धा, उत्सवाचे या प्रसंगातून आणखी आवश्यक तेवढे तपशीलवार वर्णन लेखकाने कादंबरीमध्ये केले आहे. यामधूनच ग्रामजीवनाचे दर्शन घडते. मेलेल्या माणसाचे श्राद्ध घालणे, पीकपाणी चांगलं होऊ दे म्हणून नवस बोलणे, मुलगा व्हावा म्हणून नवस-व्रत करणे इत्यादी ग्रामीण जीवनातील रूढी, परंपरांचे, सामान्यजनजीवनाचे असे नेमके तपशील व अचूक संदर्भ दिले असल्याने कादंबरीमध्ये अस्सल वास्तवतेचा प्रत्यय येतो.

'अशी धरतीची माया' (मरळी मन्निगे) ही कन्नड ग्रामीण कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये मंगरूळ जिल्ह्यातील समुद्राच्या तीरावरील कोडी गाव आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर याचे वर्णन आले आहे. औद्योगिक नागरी प्रभावापासून दूर, अलक्षित असे ग्रामजीवन आले आहे. जुने परंपरागत व्यवसाय, जुनी पौरात्य शिक्षण पद्धती, शेती यांचा उल्लेख आहे. ग्रामीण भागातील माणसे ही साधी व माणुसकी जोपासणारी असतात. तर काही द्वेष करणारी असतात. माणसाच्या विविध वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन घडते. विविध जाती धर्म यांचे वर्णन आलेले दिसून येते. धार्मिक श्रद्धा-अंधश्रद्धांचे सामाजिक आविष्कार, लोकांचे सामूहिक जीवन पद्धती याचे सुंदररित्या या ठिकाणी वर्णन केलेले आहे. ग्रामीण जीवन हे पूर्णपणे शहरी जीवनापासून अलिप्त आहे. रूढी, परंपरा, चालीरीती या कटाक्षाने पाळताना दिसतात. या कादंबरीमध्ये व्यक्त झालेले ग्रामीण जीवन हे पूर्णपणे वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण दिसून येते. ग्रामीण जीवन जगत असताना त्यांना अनेक प्रसंगातून माणसांच्या वृत्ती प्रवृत्तीची जाणीव होत असते. ग्रामीण समाज, तिथले रितीरिवाज, तिथली माणसे, निसर्ग, जगण्याच्या अनेक गोष्टी निश्चितच वेगळ्या ठरतात. कृषी संस्कृतीशी निगडित असल्याने ग्रामीण समाज हा थोडा वेगळा पडतो.

**निष्कर्ष :**

१. या कादंबरीमधून प्रकटलेले वास्तव चित्रण विचार प्रवृत्त करायला लावणारे आहे.
२. शेतकऱ्यांच्या जीवनात निर्माण झालेल्या अनेकविध समस्या, संकटे कादंबरीकाराने नेमकेपणाने मांडलेली दिसतात.
३. त्यातून व्यक्त होणारी शेतकऱ्यांची ससेहोलपट, हतबलता, उदासीनता, नैराश्य, वैफल्य यांचे चित्रण आले आहे.
४. समग्र कृषी जाणिवांचे व जीवनाचे वास्तववादी चित्रण या कादंबरीमधून प्रकट झालेले आहे.
५. कादंबरी मधून अस्सल ग्रामीण जीवनानुभव चित्रित केला आहे.

**समारोप**

एकुणच शेतकऱ्यांच्या शेतीतील विविध समस्या, त्यांच्यावर येणारी संकटे, त्यांच्यामधील कौटुंबिक कलह, नात्यांचे दुभंगलेपण, भावनिक गुंतागुंत आणि ताणतणाव यांच्याशी सतत संघर्ष करत राहणारा शेतकरी वर्ग या कादंबरीमध्ये चित्रित झालेला आहे. शेती हा त्यांचा सर्वात मोठा पारंपरिक व्यवसाय असूनही अजुनी या व्यवसायामध्ये असफलता दिसते. मराठीत अनुवादीत झालेली मअशी धरतीची मायाफ ही कादंबरी एकूण नव्या अनुभवाची भर घालण्याचे श्रेय या कादंबरीला मिळते. त्या कादंबरीमधून दिसून येणारे आध्यात्मिक जीवन आणि ग्रामीण जीवन, निसर्ग यांचा परस्पर संबंध कसा आहे, याचा आढावा घेतला आहे.

**संदर्भ :**


१. डॉ. कोत्तापल्ले, नागनाथ - 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता प्रकाशन, पुणे १९९३, द्वितीय आवृत्ती, पृष्ठ क्रमांक ७.
२. कारंत, शिवराम - 'अशी धरतीची माया', भावानुवाद, लोकापुर, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, द्वितीय आवृत्ती, १९९४
३. तत्रैव, ३६.
४. कीर, उमाकांत - 'पूर्वा', संपादक-दिनकर साक्रीकर, जुलै, १९८१, पृ. २९.


■■■